## जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, लातूर – सन:2025-26

### ( ई-निविदा सुचना क्रमांक - 83)

मा.अति,मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.लातूर यांचे वतीने मी कार्यकारी अभियंता (बांधकाम )जि.प.लातूर खालील रकान्यात दर्शविलेल्या कामाचे आवश्यक त्या वर्गवारीत नोंदणीकत कंत्राटदार/सुशिक्षीत बेरोजगार अभियंता/मजूर सहकरी संस्था कडून ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे निर्देशानुसार ई-निविदा प्रक्रीया पार पाडावयाची आहे.दिनांक 13/05/2026 रोजी 4.30 वाजेपासून दि.07/06/2026 रोजी 17.30 वाजपर्यत स्विकारण्यात येतील आणि दि. 09/06/2026 रोजी 14.30 किंवा तदनंतर उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | तालुका | कामाची अंदाजित किंमत | निविदा फॉर्मची किंमत | बयाना रक्कम EMD | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | **पंचायत समिती, औसा जि.लातूर येथील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी (टाईप I ते टाईप IV ) निवासस्थान इमारत बांधकाम करणे.** (I-04, II-16, III-04 & IV-02) (**प्रत्यक्षात**- I-04, II-12, III-04 & IV-02) | औसा | 9,59,86,185/- | 3540/- | 9,59,861/- | 1 वर्ष | खुला |

### अटी व शर्ती

1.शासन निर्णय क्रमांक ग्रासयो 2007 प्र.क्र.1/यो-9/ दि.20/04/2007 व दि. 08/05/2007 अन्वये जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र असने बंधनकारक आहे.

2.महाराष्ट्र शासन सा.बां.वि. शासन निर्णय क्र.सीएटी-06/2014/प्र.क्र.242/इमारती-2 दि.24.02.2016 नुसार बयाना रक्कम ई.एम.डी.1% रक्कम Net Banking व्दारे भरणे आवश्यक आहे.

3.महाराष्ट्र शासन पत्र क्र.याचिका 2018/प्र.क्र.198/बांधकाम-4 दि.12 ऑक्टोबर 2018 अन्वये मा. सर्वोच्च न्यायालय, सुमोट क्र.1/2015 याचिकेच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने सर्व विकासक, कंत्राटदार, व बिल्डर यांनी आस्थापना म्हणू महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगाराची नोंदणी आवश्यक आहे.

4.निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे स्विकारल्या जातील.

5.पात्र निवीदा धारकांचा व्यापारी दराचा लिफाफा क्रमांक ०२ उघडण्याचा दिनांक व वेळ संबंधितास ई-निवीदा कार्यप्रणाली मार्फत कळविले जाईल.व्यापारी दराचा लिफाफा उघडल्यानंतर लघुत्तम (L-1) निवीदा धारकाने आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करणे कामी तात्काळ कार्यालयाशी संपर्क साधुन सादर करणे बंधनकारक राहील.या बाबत कार्यालयाकडून कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.त्यानंतर निविदेबाबत कार्यालय घेईल तो निर्णय निवीदा धारकास बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

6.पात्र निवीदा धारकाकडून विहीत केलेली सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करतेवेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांचे नावे येथे देय असलेल्या राष्ट्रीयकत बँकेचा FDR सादर करावा लागेल व उर्वरीत सुरक्षा अनामत रक्कम प्रथम देयकामधुन कपात करण्यात येईल.

7.निविदे बाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना,शुध्दीपत्रके अथवा इतर माहीती केवळ http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध होईल.

8.निवीदा प्रपत्रातील व नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.तसेच प्राप्त निवीदापैकी कोणतीही निवीदा अथवा सर्व निवीदा कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे येईल अथवा रदद करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकर्ते यांनी राखुन ठेवला असुन निवीदा सादर करणा-या कोणत्याही ठेकेदारास निवीदा फेटाळण्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.किंवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

9.निविदा एकुण दोन पॉकिटामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

10.लिफाफा क्र. 1 मध्ये पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत-

A) इसारा रक्कम व निविदा फी भरणा केलेली ऑनलाईन पावती,

B) अ.क्र.1 नुसार जि.प. वैध नोंदणी प्रमाणपत्र,

C) Similar Type Of Work असलेले Work Done जोडणे आवश्यक आहे (सु.बे.अ व म.स.सं बाबत ग्रा.वि.वि.चा शा.नि.दि.05/04/2023 प्रमाणे नियम लागू व शासकिय/निमशासकिय सेवानिवत्त अभियंत्यांना सा.बां.वि.शा.नि.दि.16 नोव्हेबर 2021 प्रमाणे नियम लागू)

D) सार्वजनिक बांधकाम विभाग,दि. 17 सप्टेंबर 2019 अन्वये रु.3.00 लक्षच्या पुढील सर्व कामांना बीड कॅपसिटीची अट समाविष्ट करण्याबाबत निर्देश असल्याने कंत्राटदारांनी रु.3.00 लक्षच्या पुढील सर्व कामांसाठी सनदी लेखापाल (CA) यांच्या स्वाक्षरीने प्रमाणीत केलेली बीड कॅपसिटी UDIN नंबरसह जोडणे आवश्यक आहे.

E) कंत्राटदाराचे पॅनकार्ड सोबत जोडणे आवश्यक आहे.

F) मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न (Acknoledgement of Income Tax Return Filed Assement year 2022-23, 2023-24, 2024-25,)

G) PTR/PTE नोंदणी प्रमाणपत्र व व्यवसायकर भरणा केल्याचे नादेय प्रमाणपत्र अपलोड करावे.

H) यंत्र सामुग्री व अवजारे यांची दिनांकीत यादी व कागदपत्रे अपलोड करावे

I) जीएसटी नोंदणी अनिवार्य असून नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

वरील अ.क्र. 10 मधील सर्व मुळ कागदपत्रे स्कॅन करुन निविदेसोबत अपलोड करणे आवश्यक आहे झेरॉक्स प्रत स्कॅन करुन अपलोड केल्यास निविदेतून अपात्र करण्यात येईल.

लिफाफा क्र. 2 <u>आर्थिक लिफाफामध्ये फक्त निविदेचा दर सादर करावा.</u>

11. कोणत्याही परिस्थितीत कार्यारंभ आदेश मिळालेल्या तारखेपासून (7) सात दिवसाचे आत कामास सुरुवात केली पाहिजे. अन्यथा निविदा बयाणा / इसारा रक्कम जप्त करुन निविदाची पुढील कार्यवाही केली जाईल.
12. निविदा एकदा खरेदी केल्यानंतर त्याची रक्कम परत मिळणार नाही.
13. निविदा मधील दर ठेकेदारास 120 दिवसापर्यंतच्या कालावधीनंतर व त्या बाबत ठेकेदाराचे नियेदन या कार्यालयास मिळेपर्यंत बंधनकारक राहील.
14. सदर कामाच्या देयकातुन आयकर, विक्रीकर, गौणखनीज, सुरक्षा ठेव इ. नियमाप्रमाणे कपात केल्या जातील.
15. कामाची विमा रक्कम **कार्यारंभ आदेश देण्याच्या** पुर्वी शासन खाती जमा करुन त्याची प्रत या कार्यालयास सादर करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.
16. कामाचे अंदाजपत्रकीय किंमतीनुसार शासन निर्णयाप्रमाणे ठेकेदाराने अनुज्ञेय मुद्रांकावरती (Stamp Duty) करारनामा करुन दिल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येतील.
17. शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग, शा.नि.क्र. बीसीए-2009/प्रक्र-108/कामगार-7-अ मंत्रालय मुंबई-32 दिनांक 17/06/2010 नुसार कामाच्या अंदाजपत्रकीय किमतीच्या 1% बांधकाम कामगार कल्याण उपकर कार्यारंभ आदेश देण्याच्या पुर्वी शासन खाती जमा करुन त्याची प्रत या कार्यालयास सादर करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.
18. अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) निविदेचा लिफाफा क्र. 1 व लिफाफा क्र. 2 उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या L1 निविदाकाराने Additional Performance Security Deposit आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता (बां.) जि.प. लातूर यांचेकडे जमा करावे. देकार 15% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रकमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.व्दारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. 19% कमी दर असल्यास पुढीलप्रमाणे पृथ:करण:- 10% कमी दरापर्यंत 1% व 15% पर्यंत कमी दरापर्यंत (15%-10%=5%) तसेच (19-15) = 4% करीता (4x2=) 8% असे एकूण (1+5+8)= 14%).
19. निविदेसोबत सर्व मुळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.
20. या कामाचा डिफेक्ट लायबिलिटी 24 महिने राहील.

<u>करारनामा:-</u>

B-1. करारनाम्यातील विहित नमुन्यातील कंत्राटदाराचे घोषणा पत्र (Declaration Of The Contractor) रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर सहीनिशी अपलोड करावे व कामाचा करारनामा करतेवेळी मुळ प्रत कार्यालयास सादर करावी.

2. करारनाम्यामध्ये ब-१ निवदिच्या अटी शर्तीसह व सर्वसाधारण अटी शर्ती बरोबरच खालील बाबी स्पष्टपने नमुद करण्यात याव्यात.
3. कार्यारंभ आदेश मिळाल्यापासुन दहा दिवसाच्या आत कामास सुरवात करणे आवशक राहील अन्यथा सुरक्षा ठेवची रक्कम जप्त करून पुढील ई-निवीदा कार्यवाही करण्यात येईल.
4. शासन निर्णय दिनांक 14/01/2019 नुसार दोष दाईत्व कालावधी राहील कामामधील उणीव बारकाईने तपासाव्यात जर उणीव आढळल्यास दुरुस्ती करण्याच्या अवाक्या बाहेर असल्यास / पुर्ण कामच नव्याने करण्याची आवशकता असल्यास त्या पुन्हा बांधकाम करण्यासाठी कंत्राटदारास सुचना देऊन तीन महिण्यामध्ये काम नव्याने करून घेण्यात यावे याबाबत काही वाद उदभ्वल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल सादर करुन त्यांच्याकडून निर्णय घेण्यात यावा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय हा अंतिम व कंत्राटदारास बंधनकारक राहील.
5. झाडांबाबत कंत्राटदाराने रस्ता/बांधकाम चालू कामाच्या आवारात जेवढी झाडे काढली तेवढी अधीकची 75 झाडे लावणे बंधनकारक राहील B-1 निवीदेमधील झाडांबाबतची अट पाळण्यात यावी.
6. दि. 01 जुलै 2017 नंतर लागू झालेल्या जीएसटीच्या कराच्या बोज्याचा विचार करुनच निविदा सादर करावी व नियमानुसार जीएसटी देय राहील.
7. निविदेत सादर केलेली तांत्रिक कागदपत्रे उदा. नोंदणी प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, बिड कॅपॅसिटी इ. कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळल्यास माझी निविदा रदद करावी तसेच मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन असे हमीपत्र कंत्राटदाराने रु. 100/- च्या बॉन्ड पेपर देणे बंधनकारक आहे व सदरचे बॉण्ड पेपर निविदा सादर करताना सोबत जोडणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता (बां),
जिल्हा परिषद, लातूर.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, लातूर.

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, लातूर

Signature Not Verified
Digitally signed by TADVI ASLAM JUMMA
Date: 2026.05.13 15:22:34 IST
Location: Maharashtra-MH